**(CNR No.:-MHSO-1900-1789-2021)**
*(आप्पाराव सुळे Vs. विष्णु सुळे)*

**नि.१५ वरील आदेश**
**(पारीत दिनांक २३/११/२०२३)**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादीने प्रतिदाव्यातील प्रतिवादी विरुद्ध अंतरीम मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलला आहे.

०२. संक्षिप्तमध्ये अर्ज असा की, मौजे गलंदवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथील खालीलप्रमाणे वर्णनाची शेतजमीनः–

| अ.क्र. | गट क्र. | क्षेत्र, हे.आर | आकार, रु.पै. |
|---|---|---|---|
| अ | ७१/४/अ | ०१.२५ | १-१५ |
| ब | ७१/४/ब | ०१.२५ | १-१५ |
| क | ७१/४/क | ००.४० | ०-३५ |
| ड | ७१/४/ड | ००.४० | ०-३५ |

हा या दाव्याचा वाद विषय असून संक्षिप्ततेसाठी यापुढे वर नमुद मिळकतीचा उल्लेख केवळ 'दावा मिळकत' असे करण्यात येईल.

०३. प्रतिदाव्यातील वादीचे कथन असे आहे की, दावा जमीन मुळ गट क्र.७१/४ ही वादी व प्रतिवादी यांचे वडील नारायण धोंडीबा सुळे यांचे वडिलार्जित मालकीची होती. सदर जमीनीचे वाटप मा.तहसिलदार यांचे वाटप आदेश क्र.जमा/१/वाटप/कावि/२०८/०६, मोहोळ दि.१२/०६/२००६ अन्वये वाटप झालेले आहे. सदर वाटपाप्रमाणे दावा कलम १अ व १क ही जमीन प्रतिदाव्यातील वादी यास मिळालेली आहे तर दावा कलम १ब व १ड ही

शेतजमीन प्रतिदाव्यातील प्रतिवादी यास मिळालेली आहे.

०४. प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांच्या शेतजमीनीत म्हणजेच दावा कलम १ब गट क्र.७१/४/ब या शेतजमीनीत वादी व प्रतिवादी यांचे वडील नारायण सुळे यांनी त्यांच्या हयातीत बोअरवेल पाडलेले होते. नारायण सुळे हे मयत झाल्यानंतर सदर बोअरवेलची मालकी व कब्जे वहिवाट वादी व प्रतिवादी हे समान हिश्याने करीत होते. सदर बोअरवेलमध्ये वादी व प्रतिवादी यांचा समान हिस्सा होता. सदर बोअरवेल प्रतिदाव्यातील प्रतिवादी यास वाटपातून आलेली शेतजमीन गट क्र.७१/४/ब मध्ये आहे. सदर बोअरवेलमध्ये जाण्या-येण्यासाठी प्रतिदाव्यातील प्रतिवादीने वादीस त्याच्या शेतजमीनीतून पाऊलवाट रस्ता दिलेला आहे. सदर बोअरवेलचा वापर व मोटारीमध्ये वादी व प्रतिवादी यांनी दोघांनीही पाईपलाईन, विद्युत कनेक्शन, बोअरवेल, मोटार, विद्युत बिल याचा समान हक्काने दुरुस्ती खर्च करावयाचा आहे. त्याबाबत वादी व प्रतिवादी यांनी दोघांनी मिळून वकील कैलास नाईक नोटरी पब्लीक, मोहोळ यांचेकडे नोटरी दस्त क्र.४०९ हा दि.१८/०३/२०१९ रोजी साक्षीदार जयेंद्र पांडुरंग जाधव रामदास नागनाथ सुळे यांच्या समक्ष केलेला आहे. असे असतानाही सदर बोअरवेलचा वापर करण्यास प्रतिदाव्यातील प्रतिवादी हा सप्टेंबर २०२१ च्या पहिल्या आठवडयापासून हरकत अडथळा करु लागला आहे. प्रतिदाव्यातील वादीने प्रतिवादीस समजावण्याचा प्रयत्न केला असता प्रतिदाव्यातील प्रतिवादी हा ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. प्रतिदाव्यातील प्रतिवादी याच्या कृत्याने वादीचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होत आहे. सबब, प्रतिदाव्यातील वादीने प्रस्तुत अर्जाव्दारे प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांची शेतजमीन गट क्र.७१/४/ब या शेतजमीनीत नोटरी दस्तात वर्णन केल्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचा बोअरवेलचे समान हक्काच्या व अधिकाराच्या प्रतिदाव्यातील वादीच्या वापरास व सदर बोअरकडे पाऊलवाट

जाण्यास प्रतिदाव्यातील प्रतिवादीने हरकत, अडथळा करु नये अशी अंतरीम मनाई हुकूम प्रतिदाव्यातील प्रतिवादीला देण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

०५. प्रस्तुत अर्जास प्रतिदाव्यातील प्रतिवादीने निशाणी क्र.२१ वर म्हणणे दाखल करुन प्रतिदाव्यातील वादीच्या अर्जातील संपुर्ण कथने नाकारली आहेत. प्रतिदाव्यातील प्रतिवादीच्या कथनानूसार दावा जमीन गट क्र.७१/४/क मध्ये एक बोअरवेल वादीचे वडीलांनी त्यांचे हयातीत पाडले होते व सदर बोअरवेलमध्ये वाटपामध्ये प्रतिदाव्यातील प्रतिवादीस १/२ हिस्सा दिला होता. तसेच गट क्र.७१/४/अ व ७१/४/ब या जमीनीचे हद्दीचे बांधावरुन पुर्व पश्चिम असा रस्ता पुर्वीपासून वहिवाटीस होता व तो रस्ता पुढे पुर्वेस सरळ असा गट क्र.७१/४/क मधुन गट क्र.७१/४/ड पर्यंत होता व आहे. परंतु प्रतिदाव्यातील वादीने सप्टेंबर २०२१ चे पहिल्या आठवडयापासून सदर समाईक बोअरवेलमधुन पाणी घेण्यास व रस्ता वहिवाटीस हरकत करु लागाला. प्रतिदाव्यातील प्रतिवादीने प्रतिदाव्यातील वादीस समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता त्यास प्रतिदाव्यातील वादी ऐकण्याचा मनस्थित नाही. त्यामुळे प्रतिदाव्यातील प्रतिवादीस त्याचे मालकीची जमीन वहिवाटणे अशक्य झाले आहे व त्यामुळे मुळ दाव्यातील वादीने प्रस्तुत प्रतिदाव्यातील वादीविरुध्द सदरचा दावा दाखल केला आहे. परंतु, सदर दाव्यास शह देण्यासाठी व त्रास देण्यासाठी प्रतिवादीने प्रस्तुतचा प्रतिदावा वादीविरुध्द केला आहे. त्यामुळे दाव्यातील वादीने प्रतिवादीचा प्रतिदावा खर्चासह रद्द व नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०६. अर्ज व म्हणणे यावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ निघतात, त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिदाव्यातील वादीच्या लाभात सकृतदर्शनी केस आहे काय ? | होकारार्थी |
| २. | न्यायाचा तौलनिक कल प्रतिदाव्यातील वादीच्या लाभात असल्याचे प्रतिदाव्यातील वादीने सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी |
| ३. | मनाई हुकुम न दिल्यास प्रतिदाव्यातील वादीचे पैशाने न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होईल हे प्रतिदाव्यातील वादीने सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

०७. प्रतिदाव्यातील वादीने त्याच्या कथनापुष्ट्यर्थ निशाणी क्र.१८, ३८ व ४२ वर खालील प्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेतः–

१) वादी व प्रतिवादी यांचेत झालेल्या रस्त्याबाबतचे करारपत्राची सत्यप्रत.

२) साक्षीदार रामदास नागनाथ सुळे, जयेंद्र पांडुरंग जाधव, सोमनाथ पांडुरंग वाघमोडे आणि नागनाथ शिवाजी सुळे यांचे प्रतिज्ञापत्र.

३) मौजे गलंदवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथील गट क्र.७१/४/अ चा ७/१२ उतारा व गाव नमुना ८–अ चा उतारा.

४) मौजे गलंदवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथील गट क्र.७१/४/अ चा ७/१२ उतारा व गाव नमुना ८–अ चा उतारा.

५) फेरफार क्र.७७० चा ६ड उतारा.

६) मौजे गलंदवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर गट क्र.७१/४/क चा ७/१२ उतारा.

०८. प्रतिदाव्यातील प्रवितादीने त्याचे कथनांचे पुष्टयर्थ कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत.

०९. प्रतिदाव्यातील वादी व प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**मुद्दा क्र.१ ते ४ बाबत** –

(वरील सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्याचे विवेचन एकत्र केलेले आहे)

१०. मुळ दावा वादीने प्रतिवादीविरुध्द दावा मिळकत गट क्र.७१/४/क मधील सामाईक बोअरवेलचे १/२ हिश्श्याने पाणी घेण्यास व दावा मिळकत गट क्र.७१/४/ड मध्ये जाणे येण्यासाठी वादीचे रस्ता वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये यासाठी प्रतिवादीचे विरुध्द मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला होता. सदर मुळ दावा वादीने नि.४० येथे पुरशीस दाखल करुन काढून घेतला आहे.

११. प्रतिदाव्यातील वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांची दावा कलम १ब म्हणजेच शेतजमीन गट क्र.७१/४/ब मधील बोअरवेलचे वादी व प्रतिवादी यांचे समान हक्काच्या व अधिकाराच्या वापरास व सदर बोअरवेलकडे पाऊलवाटेने जाण्यास हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त मनाई प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांचे विरुध्द मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिदाव्यातील वादीच्या कथनावरुन, अभिलेखावरुन व उपलब्ध कागदपत्रांवरुन

प्रतिदाव्यातील वादीने प्रतिदाव्यातील प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी समर्थनीय पुराव्याआधारे सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय हे पाहणे आवश्यक आहे.

१२. प्रतिदाव्यातील वादीच्या कथनांचे व प्रतिदाव्यातील प्रतिवादीचे म्हणणे यांचे अवलोकन करता मुळ दावा मिळकत गट क्र.७१/४ ही वादी व प्रतिवादी यांचे वडील नारायण धोंडीबा सुळे यांचे वडिलार्जित मालकीची असल्याबाबत कोणताही वाद वादी व प्रतिवादी यांचेमध्ये उपस्थित नाही. तसेच सदर मिळकतीचे मा.तहसिलदार, मोहोळ यांचेकडील वाटप आदेश क्र.जमा/१/वाटप/कावी/२०८/२००६, दि.१२/०६/२००६ अन्वये वादी व प्रतिवादी यांचेमध्ये समान वाटप झाल्याबाबत देखील कोणताही वाद उपस्थित नाही.

१३. प्रतिदाव्यातील वादीच्या कथनानूसार दावा मिळकत मुळ गट क्र.७१/४ चे वरील आदेशान्वये वाटप होवून दावा कलम १अ व १क ही मिळकत प्रतिदाव्यातील वादी याचे मालकी व कब्जेवहिवाटीस असून दावा कलम १ब व १ड ही मिळकत प्रतिदाव्यातील प्रतिवादी याचे मालकी व कब्जे वहिवाटीस आहे. प्रतिदाव्यातील प्रतिवादी याचे दावा कलम १ब मध्ये दक्षिणेकडील बाजुस पश्चिमेकडून पुर्वेकडे १६० फुट अंतरावर वादी व प्रतिवादी यांचा समान हक्काचा एक चालु पाण्याचा बोअर वापरासाठी व त्या बोअरवेलकडे पाऊलवाट जाण्यासाठी वादी व प्रतिवादी यांना समान हक्क आहे. या संदर्भात त्यांनी नोटरीचा दस्त क्र.४०९ हा दि.१८/०३/२०१९ रोजी साक्षीदार जयेंद्र पांडुरंग जाधव व रामदास नागनाथ सुळे यांच्या समोर केलेला आहे. परंतु प्रतिदाव्यातील प्रतिवादी हा वादीच्या सदर समान हक्काच्या वापरास व जाण्या येण्यास सप्टेंबर २०२१ पासून हरकत, अडथळा करत आहे. सदर कथनाच्या पुष्टयर्थ

प्रतिदाव्यातील वादीने नि.१८, ३८ आणि ४२ वर कागदपत्रे म्हणजेच नोटरी दस्त व दावा मिळकतीचे ७/१२ उतारे दाखल केली आहेत. सदर नोटरी दस्ताचे अवलोकन करता प्रतिदाव्यातील वादी कथन करत असल्याप्रमाणे दावा कलम १ब मध्ये दक्षिणेकडील बाजुस पश्चिमेकडून पुर्वेकडे १६० फुट अंतरावर वादी व प्रतिवादी यांचा समान हक्काचा एक चालु पाण्याचा बोअर वापरासाठी व त्या बोअरवेलकडे पाऊलवाट जाण्यासाठी वादी व प्रतिवादी यांना समान हक्क असल्याबाबत वादी व प्रतिवादी यांचेमध्ये करारपत्र झाल्याचे दिसून येते.

१४. प्रतिदाव्यातील प्रतिवादीने त्याच्या म्हणण्यामध्ये दावा जमीन गट क्र.७१/४/क मध्ये एक बोअरवेल वादीचे वडीलांनी त्यांचे हयातीत पाडले होते व सदर बोअरवेलमध्ये वाटपामध्ये प्रतिदाव्यातील प्रतिवादीस १/२ हिस्सा दिला होता. तसेच गट क्र.७१/४/अ व ७१/४/ब या जमीनीचे हद्दीचे बांधावरुन पुर्व पश्चिम असा रस्ता पुर्वीपासून वहिवाटीस होता व तो रस्ता पुढे पुर्वेस सरळ असा गट क्र.७१/४/क मधुन गट क्र.७१/४/ड पर्यंत होता व आहे. परंतु प्रतिदाव्यातील वादीने सप्टेंबर २०२१ चे पहिल्या आठवडयापासून सदर समाईक बोअरवेलमधुन पाणी घेण्यास व रस्ता वहिवाटीस हरकत करु लागला. परंतु सदर कथनाच्या पुष्ट्यर्थ प्रतिदाव्यातील प्रतिवादीने कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाही. याउलट, प्रतिदाव्यातील वादीने नोटरीचा दस्त दाखल केला असून त्यामध्ये लिहुन देणार म्हणजेच आप्पाराव सुळे म्हणजेच प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांचे गट क्र.७१/४/ब क्षेत्र १हे. २५ आर. या मिळकतीमधील बोअरवेलमध्ये लिहुन घेणार विष्णु सुळे म्हणजेच प्रतिदाव्यातील वादी यांचा समान हक्क व हिस्सा आहे व तसेच सदर बोअरवेलवर जाणे–येणेकरीता प्रतिदाव्यातील प्रतिवादीने प्रतिदाव्यातील वादीस पाऊलवाट रस्ता दिलेला आहे ही बाब प्रथमदर्शनी प्रतिदाव्यातील वादीने सकृतदर्शनी सिध्द केलेली आहे. सदर नोटरीच्या दस्तातील कथनास

दुजोरा देण्यासाठी प्रतिदाव्यातील वादीने सदर नोटरीचा दस्त करतेवेळी उपस्थित साक्षीदारांची प्रतिज्ञापत्रे नि.२४ व ३४ वर दाखल केली आहेत. सदर साक्षीदारांच्या प्रतिज्ञापत्रांचे अवलोकन करता त्यांनी देखील प्रतिदाव्यातील वादीच्या कथनांना समर्थन दिलेले आहे. तसेच नि.३३ येथे सोमनाथ पांडुरंग वाघमोडे याने सत्यप्रतिज्ञेवर कथन केले आहे की, गट क्र.७१/४/ब मधील सामाईक बोअरवेलचा वापर प्रतिदाव्यातील वादी व प्रतिवादी करत होते. परंतु, सप्टेंबर २०२१ च्या पहिल्या आठवडयामध्ये आप्पाराव सुळे हे विष्णु सुळे यास सदर बोअरवेलचा वापर करण्याबाबत हरकत करु लागले. गट क्र.७१/४/क मधील सामाईक बोअरवेलच्या वापरास विष्णु सुळे यांनी आप्पाराव सुळे यास कधीही हरकत केली नव्हती. सदर दोन्ही बोअरवेल दुरुस्ती करण्याकरीता सदर साक्षीदार दावा मिळकतीमध्ये जात असल्याने त्यास त्याबाबत माहिती असल्याचे सांगितले.

१५. प्रतिदाव्यातील वादीने दावा कलम १ब मध्ये दक्षिणेकडील बाजुस पश्चिमेकडून पुर्वेकडे १६० फुट अंतरावर वादी व प्रतिवादी यांचा समान हक्काचा एक चालु पाण्याचा बोअर वापरासाठी व त्या बोअरवेलकडे पाऊलवाट जाण्यासाठी वादी व प्रतिवादी यांना समान हक्क सदर बोअरवेलचा वापर करण्यास वादी व प्रतिवादी यांचा समान हक्क असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केले असल्याने प्रतिदाव्यातील वादी यांना सदर बोअरवेलचा वापर करण्यापासून प्रतिबंध केल्यास प्रतिदाव्यातील वादी यांचे अपरिमित असे नुकसान होवू शकते. त्यामुळे प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांचे दावा मिळकत गट क्र.७१/४/ब मधील वादी व प्रतिवादी यांच्या बोअरवेलचे समान हक्काच्या व अधिकाराच्या प्रतिदाव्यातील वादीच्या वापरास व सदर बोअरवेलकडे पाऊलवाट जाण्यास प्रतिदाव्यातील प्रतिवादीस मनाई हुकूमाचा आदेश देणे आवश्यक असल्याचे

सकृतदर्शनी दिसून येते. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे–

## आ दे श

१. अर्ज (निशाणी क्र.१५) मंजूर करण्यात येतो.

२. याव्दारे प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांना आदेशीत करण्यात येते की, सदर प्रतिदाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत दावा मिळकत गट क्र.७१/४/ब मधील वादी व प्रतिवादी यांच्या बोअरवेलचे समान हक्काच्या व अधिकाराच्या प्रतिदाव्यातील वादीच्या वापरास व सदर बोअरवेलकडे पाऊलवाट जाण्यास प्रतिदाव्यातील प्रतिवादी अगर तर्फे हक्क सांगणारे इसमांनी हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांना देण्यात येते.

३. खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

ठिकाण– मोहोळ.
दिनांक–२३.११.२०२३

**(श्रीमती पी.एस.गोवेकर)**
२रे–सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मोहोळ.

CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

Name of Stenographer

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A.S. Bakale |
| Court | : | 2nd Jt. Civil Judge Jr. Division, Mohol. |
| Date | : | 23/11/2023 |
| Judgment signed by the Presiding Officer | : | 23/11/2023 |
| Judgment Uploaded on | : | 24/11/2023 |